
कृपया
सार्कोसिस्तस पासून
माझे संरक्षण करा

# म्हशींच्या मांसामध्ये सार्कोसिस्तस कसे टाळावे ?

- कच्चे किंवा अंशत शिजवलेले म्हशीचे मांस आणि उत्पाद, कुत्रे व मांजरींना खायला देऊ नये.
- म्हशीचे मांस अतिशीत तापमानावर ठेवले किंवा 70°c वर 15 मिनिटे शिजविल्यास मांसातील सार्कोसिस्तस नष्ट होतात




कुत्रे आणि मांजर यांच्या विष्ठा चारा आणि पिण्याचे पाणी दूषित करू नका.

# म्हशींमध्ये सार्कोसिस्तोसीस

भारतात सुमारे 105 दशलक्ष म्हशी आहेत, जे जवळ जवळ जागतिक म्हशीच्या लोकसंखेच्या निमपट आहे. भारताने 2013–14 दरम्यान 1.45 दशलक्ष टनांची म्हशीच्या मांसाचे निर्यातकरून 26,458 करोड रुपयांची कमाई केली आहे. म्हशींच्या मांसामध्ये परोपजीवी सार्कोसिस्तसच्या उपस्थितीमुळे निर्यात बाजारात भारतीय म्हशींच्या मांसाचे मुल्य कमी होत आहे. सार्कोसिस्तीस हे एक प्रोटोझोल रोग आहे, ज्याचे लैंगिक जीवनचक्र कुत्रे व मांजरीमध्ये आणि अलैंगिक जीवनचक्र म्हशी व गायींमध्ये पूर्ण होते. म्हशींच्या मांसामध्ये उपस्थित असणारे काही महत्वाचे सार्कोसिस्तस खाली दिले आहेत.

| सार्कोसिस्तसचे प्रजाती | मध्यस्थ यजमान स्नायूंमध्ये सार्कोसिस्तस | निश्चित यजमान विष्ठेमध्ये स्पोरोसिस्तस |
|---|---|---|
| **सार्कोसिस्तस लेविनेइ** | **म्हशी** | **कुत्रा** |
| **सार्कोसिस्तस फुसिफोर्मीस** | **म्हशी** | **मांजर** |

कुत्रे, मांजरे इत्यादी म्हशींचे कच्चे मांस किंवा अर्धवट शिजवलेले मांस खाल्यामुळे सार्कोसिस्तास मध्ये उपस्थित असलेले ब्रॅदिजोइत्स आतड्यांमध्ये बाहेर येतात. ब्रॅदिजोइत्स आतड्यावरील पृष्ठभागाच्या पेशींच्या थराला नुकसान करतात, ज्यामुळे अतिसार व जुलाब होतो.

म्हशींना कुत्रे व मांजरी यांच्या विष्टेपासून दुषित झालेला चारा खाल्यावर, स्पोरोसिस्तास मध्ये उपस्थित असलेले स्पोरोजोइत्स आतड्यांमध्ये बाहेर येतात स्पोरोजोइत्स आतड्यावरील पृष्ठभागाच्या पेशीमध्ये शिरतात आणि तिथून शरीराच्या सर्व स्वयसेवी स्नायूंमध्ये पसरतात. अशा प्रकारे काकडीच्या बियाण्याच्या आकाराचे सार्कोसिस्तस तयार होतात आणि स्नायूमध्ये दाखल होतात.

प्राण्यांमुळे माणसाला होणारे रोग सार्कोसिस्तस होमिनीस उपस्थित असलेल्या गुराडोरांचे कच्चे अथवा अंशत शिजवलेले मांस खाल्यास माणसामध्ये अतिसार व जुलाब होऊ शकतो. अजूनही हे समजले नाही कि गायींच्या मांसामध्ये उपस्थित असणारे समान गुणधर्माचे सार्कोसिस्तास होमिनीस म्हशींच्या मांसामध्ये पण उपस्थित आहेत का ज्याच्यामुळे म्हशींचे अर्धवट शिजवलेले मांस खाल्यास माणसामध्ये अतिसार व जुलाब होतो.

कृपया, अधिक माहिती साठी येथे संपर्क साधा :

संचालक
आसीएआर – राष्ट्रीय मांस संशोधन केंद्र,
चेन्नीचेरला ,पो. बॉ नं19 , पोस्ट बोदुप्पाल, हैदराबाद – 500 092
फोन : 040 – 29801672, फॅक्स : 040 – 29804259
ई–मेल nrcmeat_director@yahoo.co.in | वेब: www.nrcmeat.org.in



द्वारे तयार
डॉ. सी. रामाक्रीष्णा,
वरिष्ट वैज्ञानिक
डॉ. एल आर चटलोड,
वैज्ञानिक
डॉ. एस .वैध्यानाथन,
प्रमुख वैज्ञानिक
डॉ. एम. मुथुकुमार,
वरिष्ठ वैज्ञानिक
पी. लावण्या,
सिनिअर रिसर्च फेलो

अपेडा, न्यू दिल्ली द्वारे
आर्थिक साहाय्य